# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

## (म्हाडाचा घटक)

## सर्वसामान्याना परवडणाऱ्या सदनिकाच्या विविध योजना

## (प्रधानमंत्री आवास आणि म्हाडा गृहनिर्माण योजना)



सोडत
फेब्रुवारी
२०२३

# माहिती पुस्तिका

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन,
महावीर स्तंभाजवळ,

सिवीएस रोड, औरंगाबाद-४३१ ००१.

Email : emaurmhada@gmail.com
Website : https://www.housing.mhada.gov.in



**मा. श्री. एकनाथ शिंदे**

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा. श्री. देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा. सौ. वल्सा नायर सिंह**

अप्पर मुख्य सचिव

गृहनिर्माण विभाग



**मा. श्री. अनिल डिग्गीकर**

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी

म्हाडा, मुंबई

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

**(म्हाडाचा विभागीय घटक)**

**सर्वसामान्यांना परवडणाऱ्या गाळे/सदनिका/निवासी भुखंडाच्या विविध योजना**

**(प्रधानमंत्री आवास, व म्हाडा गृहनिर्माण योजना)**

**(ऑनलाइन सोडत- २०२३)**

**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, महावीर स्तंभाजवळ,**

**सिबीएस रोड, औरंगाबाद-४३१००१.**

**Website :https://www.housing.mhada.gov.in**

**हेल्प लाईन क्रमांक**

१. अर्ज नोंदणी करीता **- ०२२ ६९४६८१००**

**२.** ऑनलाईन पेमेंट करीता **- ८४११००३७२३**

# मनोगत

म्हाडा ही गृहनिर्माण क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेच्या घरांचे स्वप्न पूर्ण करणारी अग्रगण्य संस्था आहे. विविध उत्पन्न गटातील नागरीकांसाठी वाजवी किंमत व उत्कृष्ट दर्जा असलेली घरे बांधण्यासाठी कार्यरत असणारी संस्था असा म्हाडाचा नावलौकीक आहे. सर्वसामान्य जनतेचे घराचे स्वप्न साकारण्यासाठी औरंगाबाद मंडळाची ऑनलाईन सोडत प्रसिध्द करण्यासाठी मला मनस्वी आनंद होत आहे.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाअंतर्गत औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड, या जिल्ह्यांचा समावेश होतो. आतापर्यंत औरंगाबाद मंडळाने विवीध योजनेत सदनिकांचे वितरण केले आहे.

माहे मार्च २०२३ मध्ये औरंगाबाद मंडळाची ऑनलाईन सोडत असून त्यात, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ६०५ सदनिका व म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गट याअंतर्गत ३८, अल्प उत्पन्न गट याअंतर्गत ६५, मध्यम उत्पन्न गटाकरीता १५१ व उच्च उत्पन्न गटाकरीता ३ आणि सर्व उत्पन्न गटाकरीता ७४ अशा एकुण ९३६ गाळे/सदनिका/निवासी भुखंडाच्या संगणकीय सोडतीसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशनचा शुभारंभ नविन सॉफ्टवेअर प्रणाली IHLMS २.० नुसार होणार आहे. IHLMS २.० या नविन सॉफ्टवेअर प्रणालीमुळे सामान्य नागरीकांना घरबसल्या वेबसाईट किंवा मोबाईल ॲपच्या माध्यमातून रजिस्ट्रेशन, अर्ज भरणे व ऑनलाईन पेमेंट या सुविधा उपलब्ध आहेत.

सदर ऑनलाईन सोडत संपूर्णपणे पारदर्शी असून म्हाडाने कोणत्याही एजंटची नेमणुक केलेली नाही. संगणकीय सोडतीमध्ये कोणताही मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही. त्यामुळे अर्जदारांना असे आवाहन करण्यात येते की, सर्व प्रक्रिया ऑनलाईन स्वरुपाची असून अर्जदारांनी सदर ऑनलाईन सोडतीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, ही विनंती.

**स्थळ :- औरंगाबाद.**

**दिनांक :- ०१/०२/२०२३**

मुख्य अधिकारी
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद.

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

## अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|
| म्हाडा ऑनलाईन सोडत २०२३ चे वेळापत्रक | ६ |
| योजनांचा तपशील | ७ ते १३ |
| पात्रतेच्या अटी | १४ ते १६ |
| नविन एकात्मिक लॉटरी प्रणाली २.० | १७ ते २५ |
| सदनिकांच्या संगणकीकृत सोडतीची कार्यपध्दती | २६ ते २९ |
| विशेष अटी व शर्ती | ३० ते ३२ |
| आरक्षित गटाचे नाव व विवरण तक्ता<br>प्रवर्गनिहाय/संकेत निहाय आरक्षण तक्ता<br>अर्जामध्ये लिहावयाच्या आरक्षित गटाचे नाव व विवरण | ३३ ते ३८ |
| विशेष सुचना | ३९ |
| ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज करण्यासाठी Help File | ४० |
| अर्जदारांने सादर करावयाचे कागदपत्रे/दाखले/प्रमाणपत्रे इत्यादींचे नमुने | ४१ ते ५० |

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

# ऑनलाईन संगणकीय सोडत २०२३ चे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | सोडतीसाठी जाहिरात प्रसिध्द करणे | ०७-०२-२०२३ | |
| २. | सोडतीसाठी ऑनलाईन नोंदणीची सुरुवात | ०७-०२-२०२३ | दुपारी १२.०० वाजता |
| ३. | सोडतीसाठी ऑनलाईन अर्जाची सुरुवात | ०९-०२-२०२३ | दुपारी १२.०० वाजता |
| ४. | ऑनलाईन पेमेंट स्विकृती सुरुवात | ०९-०२-२०२३ | दुपारी १२.०० वाजता |
| ५. | सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ | १०-०३-२०२३ | रात्री ११.५९ पर्यंत |
| ६. | ऑनलाईन पेमेंट स्विकृती अंतिम दिनांक | ११-०३-२०२३ | रात्री ११.५९पर्यंत |
| ७. | बँकेत RTGS / NEFT द्वारे अनामत रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक | १३-०३-२०२३ | संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ८. | सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या प्रारुप यादीची प्रसिध्दी | १६-०३-२०२३ | सायंकाळी ६.०० वाजता |
| ९. | सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या अंतिम यादीची प्रसिध्दी | १८-०३-२०२३ | सायंकाळी ०६.०० वाजता |
| १०. | सोडत दिनांक | २२-०३-२०२३ | सकाळी ११.०० वाजता |
| ११. | सोडतीमधील यशस्वी व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे. | २२-०३-२०२३ | सायंकाळी ६.०० वाजता |

| अ. क्र. | संकेत क्रमांक | योजनेचे नाव | सदनिकेची अंदाजित किंमत (रु.) | चटई क्षेत्रफळ (चौ.मी.) | बांधकाम क्षेत्रफळ (चौ.मी.) | एकुण सदनिका | आरक्षण गटनिहाय उपलब्ध सदनिका | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC) (एकूण आरक्षण ११ %) | अनुसूचित जमाती (S.T.) | भटक्या जमाती (N.T.)- | .विमुक्त जमाती (D.T.)- | पत्रकार | स्वातंत्र्य सैनिक | अंध व शारिरिक दृष्ट्या अपंग | संरक्षण दल किंवा सिमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या व्यक्तीचे कुटुंबीय अथवा लढाईत जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी | माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबुन असलेल्या व्यक्ती | महाराष्ट्रातील मतदारसंघाचे प्रतीनिधित्व करणारे संसदेचे विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माली सदस्य | म्हाडा कर्मचारी( ज्यांचा सेवा ५ वर्षे पुर्ण झाली आहे) | राज्य शासकीय कर्मचारी मंडळ महामंडळ इ.चे कर्मचारी (ज्यांचा सेवा ५ वर्षे पुर्ण झाली आहे यात यसपूर्वी सेवानिवृत्त झालेल्यांचा समावेश स आहे.) | शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदर सेचानिवृत्त झालेले आहेत असे केंद्र सरकारचे कर्मचारी | चित्रपट दुरदर्शन नाटक तमाशा आकाशवाणी श माध्यमातील कलाकार तसेच परफॉर्मिंग आर्टशी संबधित असलेले कलाकार (चित्रकार शिल्पकार गवई वाद्य नतैक कारागिर कवी कव्वाल व नकलाकार) | सर्वसाधारण | महारेरा नोंदणी क्रमांक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| **(अ) प्रधानमंत्री आवास योजना (PMAY)** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| **अत्यल्प उत्पन्न गट (EWS) अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.५०००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ९० एकुण रु.५९०/- विनापरतावा)** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | १६२ | ७३६ सदनिका पैकी ३२६ सदनिका एम.आय डि सी लातुर | ९३७००० | २८.९४ | ३६.३७ | ३२६ | २३ | ३३ | ३ | ९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २५८ | P५२४० ००१७४ ८६ |
| २ | १६३ | ३३ सदनिका पैकी ०४ सदनिका सिरसवाडी रोड जालना . | ८००००० | ३०.०० | ४०.७३ | ४ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | P५१४० ०००१२० १८ |
| ३ | १६४ | २४० सदनिका पैकी ५ सदनिका नक्षत्रवाडी औरंगाबाद | १०६६८५७ | २९.१८ | ४१.८७ | ५ | ० | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | P५१५० ००१३२१ २ |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १६५ | १३२ सदनिका पैकी ८ सदनिका हिंगोली | ७६१००० | २९.५१ | ३९.१२ | ८ | ० | ६ | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | P५१२०००२७५७७ |
| ५ | १६६ | २४४ सदनिका अत्यल्प उत्पन्न गट प्रधानमंत्री आवास योजना, अंबेजोगाई, बीड | ८५०००० | २९.७५ | ३६.९८ | २४४ | २७ | १५ | ४ | ४ | ६ | ६ | ७ | ५ | १२ | ५ | ५ | १२ | ५ | ५ | १२६ | रेरा नोंदणी बाकी. |
| ६ | १६७ | ३६८ सदनिका पैकी १८ सदनिका अत्यल्प उत्पन्न गट, प्रधानमंत्री आवास योजना, पडेगाव औरंगाबाद | ९९३००० | २९.७६ | ३३.४० | १८ | ० | १३ | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | P५१५०००२६५३१ |

## (ब)म्हाडा गृहनिर्माण योजना

**अत्यल्प उत्पन्न गट (EWS) अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.५०००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ९० एकुण रु.५९०/- विनापरतावा)**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | १६८ | २१८ भुखंडापैकी ८ भुखंड, भोकरदन जि.जालना | ७०४०० | ४०.०० | ०० | ८ | ० | ६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | |
| ८ | १६९ | १८० गाळया पैकी ३ गाळे अंबड जि.जालना | ३००००० | १२.७१ | १५.८४ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | |
| ९ | १७० | २९ गाळया पैकी ३ गाळे अंबड जि.जालना | ३७०००० | १२.७१ | १५.८४ | ३ | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १० | १७१ | ४७ सदनिका पैकी २४ सदनिका सिरसवाडी रोड जालना . | ८००००० | ३०.०० | ४०.७३ | २४ | १ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०० | ० | ० | ० | ० | २० | P५१४००००१२०१८ |

**अल्प उत्पन्न गट (LIG) अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.१००००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ९० एकुण रु.५९०/- विनापरतावा)**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १७२ | १५० भुखंडापैकी २ भुखंड, भोकरदन जि.जालना | १०१७५० | ५५.०० | ०० | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| १२ | १७३ | ३५ गाळ्यापैकी ३ गाळे अल्प उत्पन्न गट कन्नड जि. औरंगाबाद. | १२५२८९७ | ३३.३५ | ४२.१४ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| १३ | १७४ | २० गाळ्यापैकी १ गाळा अल्प उत्पन्न गट कन्नड जि. औरंगाबाद | ७०७२५० | २०.४५ | २९.०४ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १४ | १७५ | ८० सदनिका पैकी ११ सदनिका, अल्प उत्पन्न गट, हिंगोली | ११६४००० | ३७.८५ | ४८.२१ | ११ | १ | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ | |
| १५ | १७६ | ६९ गाळ्या पैकी १३ गाळे गंगाखेड रोड, परभणी | ४२७००० | १८.५० | २२.९३ | १३ | २ | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ | |
| १६ | १७७ | ११२ भुखंडा पैकी ८ भुखंड , गंगाखेड रोड, परभणी | १३६००० | ४०.०० | ०० | ८ | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | |
| १७ | १७८ | ८४ सदनिका पैकी ४ सदनिका , एम.आय.डि.सी एरीया उस्मानाबाद | १४०६००० | ३७.८५ | ४८.२१ | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | |
| १८ | १७९ | १०० **गाळयापैकी १ गाळा गट नं ७४ (भाग) देवळाई,** | १०४३००० | २०.४५ | २९.०४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | औरंगाबाद. | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १९ | १८० | ६० गाळयापैकी १ गाळा , नविन कौठा नांदेढ | ४९६००० | १८.५० | २२.९३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| २० | १८१ | ५९ भुखंडा पैकी १८ भूखंड, स.क्रं.२३६/२/२ (भाग), नळदुर्ग जि.उस्मानाबाद | १४४७९२ | ७२.०० | -- | १८ | १ | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १३ | |
| २१ | १८२ | ४८ सदनिका पैकी ३ सदनिका, हिंगोली | ११०००० | ४२.४० | ५६.५१ | ३ | ० | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ०० | ० | ० | ० | ० | ० | P५१२०००२७५७७ |

**मध्यम उत्पन्न गट (MIG) अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.१५०००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ९० एकुण रु.५९०/- विनापरतावा)**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | १८३ | ६८ भुखंडापैकी १ भुखंड भोकरदन जि.जालना | ३३७५०० | १३५.० | -- | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| २३ | १८४ | ३० सदनिका पैकी १ सदनिका, हिंगोली | १७४८५०० | ५०.३१ | ६२.४२ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २४ | १८५ | ७२ भुखंडा पैकी ४५ भुखंड टोकवाडी ता.मंठा, जि.जालना | १२२११७ | १४०.८५ | -- | ४५ | ३ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४० | |
| २५ | १८६ | ४८ सदनिका पैकी ४ सदनिका, गृहनिर्माण भवनाजवळ औरंगाबाद. | ३१५७००० | ४४.४० | ४९.४५ | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | १८७ | १०४ गाळया पैकी १ गाळा गट नं ७४ (भाग) देवळाइ औरंगाबाद. | १९२५००० | ३३.४५ | ४२.१४ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २७ | १८८ | १९ भुखंडा पैकी ३ भूखंड, २३६/२ (भाग) नळदुर्ग जि.उस्मानाबाद | ३६०००० | १२०.० | -- | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | |
| २८ | १८९ | १२ सदनिका पैकी ४ सदनिका, हिंगोली. | १७४८५०० | ५०.३१ | ६२.४२ | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | |
| २९ | १९० | १६८ सदनिका पैकी ९२ सदनिका, पडेगाव, औरंगाबाद | १७९०००० | ५९.७६ | ६४.५१ | ९२ | ० | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ८७ | P५१५०००१९७९८ |

**उच्च उत्पन्न गट (HIG) अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.२००००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ९० एकुण रु.५९०/- विनापरतावा)**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | १९१ | ४८ भुखंडा पैकी २ भुखंड,भोकरदन जि.जालना | ५९४००० | १८०.० | -- | २ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ३१ | १९२ | ८४ सदनिका पैकी १ सदनिका, बन्सीलाल नगर औरंगाबाद. | १४००००० | ३४.३ | ४१.९५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |

## सर्व उत्पन्न गट (AIG) अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.१००००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ९० एकुण रु.५९०/- विनापरतावा)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | १९३ | १६० सदनिका पैकी १३ सदनिका, पैठण जि.औरंगाबाद | ९८०००० | ४०.६७ | ५५.०४ | १३ | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ८ | |
| ३३ | १९४ | २४८ सदनिका पैकी २८ सदनिका, गट नं ७४ (भाग)देवळाई औरंगाबाद | १४००००० | ४०.६८ | ५४.७४ | २८ | ४ | १२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १२ | |
| ३४ | १९५ | १६ सदनिका पैकी २ सदनिका गट नं७४ (भाग)देवळाई औरंगाबाद | १४००००० | ४०.६८ | ५४.९८ | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| ३५ | १९६ | १२ सदनिका पैकी २ सदनिका गट नं७४ (भाग)देवळाई औरंगाबाद | १५४०००० | ४०.६८ | ५७.०३ | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| ३६ | १९७ | १६ सदनिका पैकी ३सदनिका गट नं७४ (भाग)देवळाई औरंगाबाद | १५४०००० | ४०.६९ | ५८.४७ | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | |
| ३७ | १९८ | ६२ सदनिका पैकी १४सदनिका गट नं.७४ (भाग)देवळाई औरंगाबाद | १३३०००० | ३४.२५ | ४८.६४ | १४ | ३ | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६ | |
| ३८ | १९९ | ३२ सदनिका पैकी ७ सदनिका गट नं७४ | १४००००० | ३४.२५ | ४८.८८ | ७ | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (भाग)देवळाई औरंगाबाद | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३९ | २०० | ०८ सदनिका पैकी ०३ सदनिका गट नं७४ (भाग)देवळाई औरंगाबाद | ११९०००० | २९.७९ | ४०.०३ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | |
| ४० | २०१ | ०८ सदनिका पैकी ०१ सदनिका गट नं७४ (भाग)देवळाई औरंगाबाद | १५४०००० | ४०.६९ | ५८.६० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| ४१ | २०२ | ०२ सदनिका पैकी ०१ सदनिका गट नं७४ (भाग) देवळाई औरंगाबाद | १०५०००० | २४.७२ | ३५.०५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |

## **१. पात्रतेच्या अटी**

**ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी अर्जदारांनी माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी.**

औरंगाबाद मंडळातील सदनिकांच्या विक्रीसाठी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम-१९८१ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम-१९८१ यामधील तरतुदी अनुसार व त्या त्या वेळी लागू केल्या जाणाऱ्या तरतूदींच्या अधीन राहून इच्छुक अर्जदारांकडून या सदनिकांच्या विक्री करिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१.१. अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.**

**१.२. अर्जदार किंवा त्यांची पत्नी / पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर इतर हक्काद्वारे संपादीत केलेले निवासी घर अथवा निवासी भुखंड अर्ज करीत असलेल्या योजनेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेत म्हणजेच त्या ग्रामपंचयात / नगरपालिका / महानगरपालिका हद्दीत नसावा.**

**१.३. अर्जदार महाराष्ट्रातील अधिवासी / मागील सलग २० वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये, अर्जदाराचे किमान १५ वर्षाचे वास्तव्य असणे आवश्यक आहे. त्यासाठी मागील ५ वर्षातील (बारकोड असलेले) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) / रहिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (केंद्र शासन कर्मचारी (CG) प्रवर्ग - आरक्षण वगळून)**

१.४. **अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न विविध उत्पन्न गटासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे असावे.** " कौटुंबिक वार्षिक उत्पन्न " म्हणजे अर्जदाराचे स्वत:चे एकटयाचे व त्यांची पत्नी / पती यांची मासिक प्राप्ती असल्यास दोघांचे मिळून नोकरीद्वारे अथवा उद्योगधंद्यापासून, जीवितार्थाचे सर्वसाधारण दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ या कालावधीत झालेल्या प्राप्तीवरुन परिगणीत करण्यात यावे.

**अर्जदाराचे गटनिहाय वार्षिक कौटुंबीक कमाल उत्पन्न मर्यादा (रुपये वार्षिक) खालीलप्रमाणे राहील. (महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक प्रआयो-२०१९/प्र.क्र.१२६/गृनिधो-२,दि.१४ जून २०२२ रोजीच्या सुधारीत परीपत्रकानूसार )**

**अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न गटनिहाय खालीलप्रमाणे असणे आवश्यक राहील.**

| **संकेत क्रं १७९ १८६,१८७, १९० व १९२ करीता** | | |
|---|---|---|
| **अनु क्रं** | **उत्पन्न गट** | **कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा (औरंगाबाद शहर तसेच १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्राकरीता)** |
| १ | EWS/LIG/MIG/HIG | रुपये ६,००,०००/- पर्यंत |
| २ | LIG/MIG/HIG | रुपये ९,००,०००/- पर्यंत |
| ३ | MIG/HIG | रुपये १२,००,०००/- पर्यंत |
| ४ | HIG | कमाल मर्यादा नाही. |
| ५ | सर्व उत्पन्न गट (AIG) | उत्पन्न मर्यादा शिथील |

| **संकेत क्रं १६८,१६९,१७०,१७१,१७२,१७३,१७४,१७५,१७६,१७७,१७८,१८०,१८१,१८२,१८३,१८४,१८५,१८८, १८९, व १९१ करीता** | | |
|---|---|---|
| **अनु क्रं** | **उत्पन्न गट** | **कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा ( १० लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्राकरीता)** |
| १ | EWS/LIG/MIG/HIG | रुपये ४,५०,०००/- पर्यंत |
| २ | LIG/MIG/HIG | रुपये ७,५०,०००/- पर्यंत |
| ३ | MIG/HIG | रुपये १२,००,०००/- पर्यंत |
| ४ | HIG | कमाल मर्यादा नाही. |
| ५ | सर्व उत्पन्न गट (AIG) | उत्पन्न मर्यादा शिथील |

**टिप :- उपरोक्त ४ ही उत्पन्न गटासाठी किमान वार्षिक उत्पन्न मर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे अत्यल्प उत्पन्न (EWS) गटातील व्यक्ती चारही गटासाठी (उक्त तक्यातील अनु क्र.१,२,३ व ४) अल्प उत्पन्न (LIG) गटातील व्यक्ती तीन गटासाठी (उक्त तक्यातील अनु क्र.२,३,४) मध्यम उत्पन्न (MIG) गटातील व्यक्ती दोन गटासाठी (उक्त तक्यातील अनु क्र.३,४) व उच्च उत्पन्न (HIG) गटातील व्यक्ती एका गटासाठी (उक्त तक्यातील अनु क्र.४) अर्ज करु शकतात. तसेच सर्व उत्पन्न (AIG) गटासाठी (संकेत क्र.१९३ ते २०२) उत्पन्नाची अट शिथील करण्यात आलेली आहे.**


**विशेष सुचना - पंतप्रधान आवास योजने अंतर्गत अर्ज करणाऱ्या (संकेत क्रं १६२ ते १६७) अर्जदाराचे पती / पत्नीचे एकत्रित कौटुबिंक वार्षिक उत्पन्न (सन २०२१-२०२२ या कालावधीचे) रु. तीन लक्ष (३०००००/-) पेक्षा जास्त नसावे .**

१.५. द नॅशनल ट्रस्ट फॉर द वेलफेअर फॉर पर्सन्स विथ ऑटिस्म, सिरब्रेल पालसी, मेंन्टल रिटार्डेशन ॲण्ड डिसॅबिलिटिज, ॲक्ट १९९९ मधील प्रकरण ६ मधील कलम १३ ते १७ मधील तरतूदींच्या अधिन राहून गतीमंद (Mental Retired) व मनोविकृत (Mental Illness) अर्जदारांच्या वतीने संबंधित व्यक्ती / संस्था अर्ज करु शकतील व या स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या व्यक्तीस सदनिकेचे वितरण करताना त्याचे वैयक्तीक उत्पन्न विचारात घेण्यात येईल.

## 1. नवीन एकात्मिक लॉटरी प्रणाली २.०(IHLMS 2.0)

सन २०१३ पासून म्हाडा सोडतीद्वारे इच्छुक नागरिक म्हाडाच्या विविध योजनांकरता ऑनलाइन अर्ज करत आहेत तसेच म्हाडाने संगणकीय सोडतीद्वारे साठ हजारांहून अधिक अर्जदारांना त्यांच्या स्वप्नातले घर उपलब्ध करून दिले आहे. या प्रक्रियेत आतापर्यंत येणारी मोठी अडचण म्हणजे सोडतीनंतर कागदपत्रांची पडताळणी, त्याला लागणारा वेळ, अचूकता आणि महत्वाचे म्हणजे हे काम मॅन्युअल पद्धतीने केले जाते. ज्यामुळे लाभार्थ्यांना सोडतीनंतर म्हाडाच्या कार्यालयात वारंवार पाठपुरावा करण्यासाठी यावे लागते, म्हाडातील कर्मचाऱ्यांचा बहुतांश वेळही त्यांच्या समस्या सोडवण्यातच जातो.

यावर उपाय म्हणून, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत (म्हाडा) राबविण्यात येणाऱ्या विविध गृहनिर्माण योजनांसाठी वापरल्या जाणाऱ्या संगणकीय प्रणालीला अद्यावत करण्याचे नियोजन म्हाडाने केले आहे. यामध्ये अर्जदाराच्या कागदपत्राची पडताळणी ही सोडतीपूर्वीच करण्यात येणार आहे व यामध्ये पात्र होणारे अर्जदारच सोडती मध्ये सहभाग नोंदवू शकतात. खाली दाखवलेल्या आकृती प्रमाणे ही प्रणाली शासनाच्या विविध डेटाबेस सोबत जोडलेली आहे, ज्यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचा दाखला इत्यादीचा एपीआयचा वापर करून अर्जदाराच्या कागदपत्रांची पडताळणी सिस्टिम द्वारे ऑनलाईन पद्धतीने त्वरित करण्यात येईल.



## 1.1 सुधारणा

नवीन एकात्मिक लॉटरी प्रणाली अंतर्गत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

| आवश्यक टप्पे | विद्यमान प्रक्रिया | सुधारणा |
|---|---|---|
| पात्रतेची पडताळणी | सोडतीनंतर | सोडतीपूर्वी |
| अर्ज कोठून करू शकतो | वेबसाइट | वेबसाइट व मोबाईल उपयोजन (App) |
| सोडतीचे तर्कशास्त्र | प्रवर्गाकरिता निश्चित पद्धत | प्रवर्गाकरिता स्वयंचलित पद्धत |
| कागदपत्रांची पडताळणी | मानवीप्रक्रियेद्वारे | स्वयंचलित व ऑनलाइन API द्वारे |
| कोण अर्ज करू शकते? | कोणतीही व्यक्ती | फक्त पात्र अर्जदार |
| देकार पत्र | मानवीप्रक्रियेद्वारे | स्वयंचलित पद्धतीने |
| ना- हरकत प्रमाणपत्र | मानवीप्रक्रियेद्वारे | स्वयंचलित पद्धतीने |
| दस्त नोंदणी | मानवीप्रक्रियेद्वारे | ई- रजिस्ट्रेशन पद्धतीने |
| परतावा | दिलेल्या बँक खात्यामध्ये | जेथून पैसे आले त्या खात्यामध्ये (To Source) |
| घराच्या रक्कमेचा भरणा | मानवीप्रक्रियेद्वारे | ऑनलाइन पेमेंट गेटवेचा वापर करून |
| MIS अहवाल | मानवीप्रक्रियेद्वारे | Business Intelligence Dashboard |
| विलंब शुल्क | मानवीप्रक्रियेद्वारे विलंब शुल्क व त्यावरील व्याजदर ठरवितात | स्वयंचलित पद्धतीने |
| सुरक्षा, शोध | मानवीप्रक्रियेद्वारे | अत्याधुनिक ब्लॉकचेन प्रक्रियेचा वापर |

यापूर्वी अर्जदाराला एकूण २७ कागदपत्रे व प्रतिज्ञापत्रे जमा करावी लागत होती. या कागदपत्रे व प्रतिज्ञापत्रे यांची संख्या कमी करून ७ एवढी करण्यात आलेली आहे. यामुळे अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी ही जलदगतीने, अचूकपणे व पारदर्शकपणे पार पाडली जाईल. तसेच कागदपत्रे पडताळणीचा कालावधी हा कमी होईल व फक्त पात्र अर्जदारांना सोडतीकरिता अर्ज करता येईल.

# 2 अर्ज कसा कराल?

सोडतीकरिता अर्ज करण्याचे टप्पे खालीलप्रमाणे विस्तृतपणे लिहले आहेत. जेणेकरून अर्जदार सोडतीपूर्वी आवश्यक कागदपत्रांची आगाऊ तजवीज करू शकेल.

## 2.1 आधार कार्डला अर्जदारांचा मोबाईल क्रमांक जोडणे

सर्व अर्जदारांनी आपला अद्ययावत मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी जोडून घेणे आवश्यक आहे. जर आधार कार्ड आपल्या मोबाईल क्रमांकाला जोडलेला नसेल तर आपल्या नजीकच्या आधार कार्ड नोंदणी केंद्रावरती जाऊन तो जोडून घ्यावा.

## 2.2 आपल्याकडे अर्ज करण्यापूर्वी सर्व कागदपत्रे असल्याचे सुनिश्चित करा

इच्छुक अर्जदारांनी, अर्ज करण्यापूर्वी पडताळणीकरिता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उपलब्ध असल्याचे सुनिश्चित करावे. सोडतीकरिता नोंदणी करण्याकरिता ही सर्व कागदपत्रे अर्जदाराला अपलोड करावी लागतील.आवश्यक कागदपत्राची यादी खाली जोडल्याप्रमाणे आहे.

- सर्व अर्जदारांकरिता लागू
- विशेष प्रवर्ग/जाती प्रवर्ग अंतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदारांकरिता

## 2.3 मोबाईल उपयोजन (App) आपल्या मोबाईल मध्ये डाउनलोड करावे

अर्जदारांनी गूगल प्ले स्टोअर (Play Store) किंवा ॲपल ॲप स्टोअर (App Store) वरुन **MHADA IHLMS 2.0** मोबाईल ॲप डाउनलोड करावे.

## 2.4 नोंदणी प्रक्रिया

यशस्वीरित्या नोंदणी करण्याकरिता अर्जदाराला आपल्या कागदपत्राची पडताळणी करून घ्यावी लागेल. यशस्वी पडताळणीनंतर अर्जदाराचे प्रोफाइल तयार होईल व अर्जदाराला स्वयंघोषणापत्रावरती आधार ई-सही करावी लागेल.

## 2.5 अर्ज करणे

नोंदणी प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर पात्र अर्जदार म्हाडा मंडळ व त्यामध्ये असलेल्या सोडत योजना निवडून अर्ज करू शकतात.

## 2.6 अनामत रक्कम व अर्ज शुल्क भरणा करणे

अर्जाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अर्जदाराला अनामत रक्कम व अर्ज शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. अर्जदार विविध पर्यायांचा जसे की, नेटबँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआयचा वापर करून रक्कमेचा भरणा करू शकतात.

## 2.7 सोडत

वरील सर्व टप्पे यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या अर्जदारांच्या अर्जाची ऑनलाइन सोडत काढण्यात येईल.

## 2.8 सोडतीनंतरच्या प्रक्रियेकरिता हेच ॲप वापरण्यात येईल

सोडतीनंतरच्या प्रक्रिया जसे की, देकारपत्र, तारण नाहरकत प्रमाणपत्र, मुलाखतीची वेळ निश्चित करणे, वाटपपत्र, घराचे हफ्ते भरणा इत्यादी करिता या ॲपचा वापर करण्यात येईल.

# 3 नोंदणीकरिता आवश्यक कागदपत्रे

## 3.1 सर्व अर्जदारांकरिता आवश्यक कागदपत्रे: अर्जदारांनी ही सर्व कागदपत्रे सोडतीपूर्वी जमा करावीत.

| **अनु. क्र.** | **प्रयोजन** | **लागणारी कागदपत्रे** |
|---|---|---|
| १ | ओळखपुरावा | आधार कार्ड |
| २ | ओळखपुरावा | पॅन कार्ड |
| ३ | आधारकार्ड पडताळणी | आधार कार्डशी संलग्न मोबईल क्रमांक |
| ४ | सध्याचा वास्तव्याचा पुरावा | जर अर्जदाराच्या आधार कार्ड वरील पत्ता हा सध्याच्या पत्त्यापेक्षा वेगळा असेल तर सध्याचा पत्ता नमूद करावा. |
| 5 | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र | तहसीलदार यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र |
| 6 | स्वतःचा उत्पन्नाचा पुरावा (विवाहित/अविवाहित/विधवा/विधुर/घटस्फोटित) | आयकर परतावा प्रमाणपत्र (ITR) वर्ष २०२१-२०२२ |
| | | **किंवा** तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा पुरावा (वर्ष २०२१-२०२२) |
| | पती/पत्नीच्या उत्पन्नाचा पुरावा | पती/पत्नीचा आयकर परतावा प्रमाणपत्र (ITR)(नोकरी असल्यास) वर्ष २०२१-२०२२ |
| | | **किंवा** तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा पुरावा (वर्ष २०२१-२०२२) |

## 3.2 विशेषप्रवर्ग अथवा जाती प्रवर्ग अंतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदारांकरिता आवश्यक कागदपत्रे

| अनु. क्र. | आरक्षण प्रवर्ग | लागणारी कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | जात/जमाती प्रवर्ग | - जात प्रमाणपत्र व<br>- जात वैधता प्रमाणपत्र |
| २ | दिव्यांग प्रवर्ग | UDID (Unique Disability Identity) कार्ड |
| ३ | कलाकार | कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले प्रमाणपत्र |
| ४ | पत्रकार | म्हाडा जनसंपर्क कार्यालयाद्वारे पत्रकार म्हणून दिलेले प्रमाणपत्र |
| ५ | स्वातंत्र्य सैनिक | |
| | अर्जदार (स्वतः स्वातंत्र्यसैनिक) | मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले प्रमाणपत्र **किंवा** |
| | | राज्य शासनाने दिलेले ताम्रपत्र/सन्मानपत्र **किंवा** |
| | | जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेले प्रमाणपत्र |
| | स्वातंत्र्यसैनिकयांचे कायदेशीर वारस | जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेले प्रमाणपत्र **आणि** |
| | | स्वातंत्र्यसैनिक यांना राज्य शासनाने दिलेले ताम्रपत्र/सन्मानपत्र |
| ६ | संरक्षणदलातील सैनिक यांचे कुटुंब | संरक्षणदलाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र आणि |
| | | जिल्हा सैनिक मंडळ यांनी दिलेले प्रमाणपत्र |
| ७ | माजी सैनिक | संरक्षणदलाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र आणि |
| | | जिल्हा सैनिक मंडळ यांनी दिलेले प्रमाणपत्र |
| ८ | संसद सदस्य / विधानमंडळ सदस्य | संसद सचिवालय / विधानमंडळ सचिवालय यांनी दिलेले प्रमाणपत्र |
| ९ | म्हाडा कर्मचारी | कर्मचाऱ्याचे ओळखपत्र |
| १० | राज्य सरकारी कर्मचारी | संबंधित कार्यालयाद्वारे दिलेले प्रमाणपत्र |
| ११ | केंद्रीय कर्मचारी | सक्षम प्राधिकरणाद्वारे दिलेले प्रमाणपत्र (प्रमाणपत्रात निवृत्तीकरिता ३ वर्षे शिल्लक असल्याचे आणि महाराष्ट्र राज्यातील कर्मचारी निवासस्थानात राहत असल्याचे नमूद केलेले असणे आवश्यक आहे) |
| | | सक्षम प्राधिकरणाद्वारे दिलेले प्रमाणपत्र (प्रमाणपत्रात निवृत्त होऊन ३ वर्षे झाल्याबाबतचे आणि महाराष्ट्र राज्यातील कर्मचारी निवासस्थानात राहत असल्याचे नमूद केलेले असणे आवश्यक आहे) |

## **४) ऑनलाईन सोडत २०२३ साठी अर्ज भरण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे :-**

४.१ अर्जदारांच्या सोयीकरीता https://housing.mhada.gov.inया म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज नोंदणी प्रक्रिया उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच येथे ॲप डाऊनलोड करण्याची लिंक देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अर्जदारांना नविन संगणकीय प्रणालीची (MHADA IHLMS २.०) माहिती देणारी मार्गदर्शनपर पुस्तिका, व्हिडीओज, हेल्प फाईल आणि हेल्प साईट या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्यापूर्वी अर्जदारांनी या मार्गदर्शनपर माहितीचे अवलोकन करावे.

४.२ नाव नोंदणीसाठी अर्जदाराने अर्जामध्ये विहीत केलेली माहिती अर्जदाराने भरणे आवश्यक आहे **तसेच * अशी** खुण असलेली माहिती भरणे बंधनकारक आहे. अशी बंधनकारक माहिती व ड्रॉप डाऊन मधील माहिती फक्त इंग्रजीमध्ये उपलब्ध राहील.

**४.३ अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करणेपूर्वी खालील माहिती सोबत ठेवावी, म्हणजे अर्ज भरणे सुलभ जाईल.**

१. नाव
२. उत्पन्न गट
३. आरक्षण प्रवर्ग
४. अर्जदार सध्या राहात असलेल्या घराचा संपूर्ण पत्ता व पोस्टाचा पिन कोड क्रमांक.
५. अर्जदाराची जन्मतारीख (पॅनकार्ड प्रमाणे).
६. आधार क्रमांक (UID No.)
७. अर्जदाराच्या बँक खात्याचा तपशिल
अर्जदाराच्या स्वत:च्या बचत खात्याचा तपशील जसे, बँकेचे नाव, शाखा व पत्ता, खाते क्रमांक, बँकेचा MICR / IFSC क्रमांक दयावा. अर्जदारास दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशील देऊन अर्ज करता येणार नाही, असे केल्यास अर्ज अवैध ठरविण्यात येतील. **तसेच चालु खाते, संयुक्तीक खाते एन.आर.आय. खात्याचा तपशील चालणार नाही.**
८. अर्जदाराचा स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) Whatsapp No. व ई-मेल आय डी देणे बंधनकारक आहे.
९. अर्जदार तसेच त्याची पत्नी / पती यांचे दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ या कालावधीतील वार्षिक उत्पन्न.
१०. अर्जदाराने अर्जामध्ये त्याचा स्वत:चा PAN No. देणे बंधनकारक आहे. सदर क्रमांक चुकीचा आढळल्यास अथवा दुसऱ्याचा पॅन कार्ड नंबर दिल्याचे आढळल्यास असे अर्ज चुकीची माहिती दिल्यामुळे कोणतेही कारण न देता रदद करण्यात येतील. पॅन क्रमांकाचे ऑनलाईन व्हेरिफीकेशन केले जाईल.

४.४ ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर अर्जदाराला त्या अकाउँटद्वारे वेगवेगळया संकेतात अथवा एकाच संकेतातील वेगवेगळया प्रवर्गात एका पेक्षा जास्त अर्ज भरता येतील. नोंदणी

४.५ अर्जदाराने एकदा नोंदणी केल्यानंतर User Name व पासवर्ड चा वापर करुन सदर अकाउँट operate करता येईल. सर्व communication हे e-mail व SMS द्वारे करण्यात येणार असल्यामुळे e-mail व Mobile No. भरताना काळजी घेणे आवश्यक आहे.

**४.६** ऑनलाईन अर्ज करणे : ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत **दि.०७/०२/२०२३ दुपारी १२.०० वाजे पासून ते दि.०८/०३/२०२३ रोजी रात्रौ ११.५९** वाजेपर्यंत राहील. अर्ज करताना आपण ज्या उत्पन्न गटाकरिता / प्रवर्गाकरिता पात्र असाल त्या उत्पन्न गटाकरिता असलेल्या संकेताकरीता व प्रवर्गाकरिता अर्ज करावा. (अर्ज करण्यासाठीची सविस्तर Help File मध्ये दिलेली आहे). त्यानंतर अर्जदाराने प्रिंटेड रिसिट मधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. अर्जदारास प्रिंटेड रिसिट बँकेमध्ये सादर करण्यापूर्वी अथवा स्कॅन करुन पाठवण्यापूर्वी असे वाटले, की माहिती टाईप करताना चुक झाली आहे तर अर्जदारास अगोदर भरलेला ऑनलाईन अर्ज Edit करुन त्यामध्ये दुरुस्ती करता येते. अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशी **रात्रौ ११.५९** नंतर अर्जदाराला पुर्ण अर्ज भरण्याची अथवा भरलेल्या या अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची संधी राहणार नाही. अर्जदाराने प्रिंटेड रिसिट मधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. प्रिंटेड रिसिट वर अर्ज क्रमांकासमोर दहा अंकी क्रमांक दर्शविला जाईल. हाच क्रमांक सोडतीसाठी विचारात घेतला जाणार आहे.

**४.७** त्यानंतर अनामत रक्कमेच्या अदायगीसाठी Payment विवरणामध्ये योग्य पर्यायाची निवड करुन अनामत रक्कम बाबतची प्रक्रिया पुर्ण करावी. ऑनलाईन पेमेंट स्विकृतीचा अंतिम **दिनांक ०९/०३/२०२३ रात्री ११.५९ पर्यंत राहील. RTGS / NEFT द्वारे** अर्जासोबत दि. **१०/०३/२०२३** पर्यंत संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत जमा करता येईल.

४.८ जे अर्जदार ऑनलाईन पेमेंट करणार आहेत त्या अर्जदारांनी, **अर्जाची प्रिंट घेतल्यानंतर किंवा जतन केल्यानंतर अर्जदाराने MY APPLICATION मध्ये जाऊन पेमेंट करावे.**

४.९ अर्जदारास त्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जामध्ये अनामत रक्कमेचा भरणा करण्यापूर्वी बदल करता येईल. अनामत रक्कमेचा भरणा केल्यानंतर अर्ज फक्त पाहता येऊ शकेल. **अर्जदाराने त्याचा ऑनलाईन अर्ज ओपन करुन त्यामध्ये कोणताही फेरफार करु नये याची नोंद घ्यावी.**

४.१० अर्जदारास सोडतीपूर्वी अनामत रक्कम भरुन बँकेकडे सादर केलेला अर्ज कोणत्याही कारणास्तव मागे घेता येणार नाही व सोडतीपूर्वी अनामत रक्कम परत मिळणार नाही. अर्जदाराने Credit Card द्वारे अनामत रक्कम परत मिळणार नाही. अर्जदाराने Credit Card द्वारे अनामत रक्कम भरल्यावर जर त्याने रक्कम परत घेतली (म्हाडाकडे पोहोचण्यापूर्वी) तर अर्जदाराचा अर्ज सोडतीकरिता ग्राहय धरला जाणार नाही.

४.११ अर्जदार त्याच्या उत्पन्न गटानुसार पात्र असलेल्या योजना संकेतासाठी अर्ज करु शकेल. तथापि एकापेक्षा जास्त पात्र योजना संकेतासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक संकेत क्रमांकासाठी स्वतंत्र अनामत रक्कमेसह वेगळा अर्ज भरावा लागेल. जर अर्जदार एकापेक्षा जास्त योजना संकेत क्रमांकामध्ये सोडतीत यशस्वी झाला, तरी त्याला त्याच्या पसंतीच्या कुठल्याही एकाच योजना संकेतासाठी कागदपत्र व प्रशासकीय शुल्क जमा करता येईल.

४.१२ अर्जदार योजना संकेतामधील ज्या प्रवर्गामध्ये अर्ज करण्यास पात्र आहे अशा सर्व पात्र आरक्षण प्रवर्गातील सदनिकांकरिता अर्ज करु शकतो.प्रत्येक योजनेतील व पात्र प्रवर्गातील सदनिकेकरिता स्वतंत्र अर्ज करावे लागतील व प्रत्येक अर्जासोबत स्वतंत्र अनामत रक्कम भरावी लागेल. **मात्र एका योजना संकेतामधील एका प्रवर्गात एकापेक्षा अधिक अर्ज करता येणार नाहीत.** एकाच संकेतामधील एकाच प्रवर्गात एकापेक्षा अधिक अर्ज केल्याचे आढळल्यास त्या अर्जदाराचे त्या प्रवर्गातील असे सर्व अर्ज कोणतेही कारण न देता रदद करण्यात येतील.

वरील अटी व्यतिरिक्त सदर योजनेतील सदनिकांसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम-१९८१ च्या अटी व शर्ती जशाच्या तशा व संपूर्णपणे (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणासह) लागू राहतील.

## ५) सदनिकांच्या संगणकीकृत सोडतीची कार्यपध्दती :-

५.१ जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या सर्व ऑनलाईन अर्जाची प्रथम पडताळणी करण्यात येईल. यांत अर्ज विहीत अनामत रकमेसह पूर्णपणे भरले आहेत की नाही हे तपासण्यात येईल. अपूर्ण आढळलेले अर्ज सोडतीपूर्वी रद्द केली जातील व त्याबाबत अर्जदाराकडून केलेल्या कोणत्याही निवेदनाचा विचार केला जाणार नाही. खालील प्रकारचे अर्ज आढळल्यास असे सर्व अर्ज सोडतीमधून बाद करण्यात येतील.

१. एकाच अर्जदाराचे एकाच संकेतामध्ये, एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त अर्ज.

२. वेगवेगळया अर्जदाराचे एकाच बँकेमध्ये एकच खाते क्रमांक.

३. चुकीचा PAN क्रमांक आढळलेले अर्ज.

४. विहीत मुदतीमध्ये अनामत रक्कम जमा झाले नाहीत असे अर्ज.

५. ऑनलाईन अर्ज चालू होण्यापूर्वी व मुदत संपल्यानंतर केलेले अर्ज. ऑनलाईन अर्ज चालु होण्याची व बंद होण्याची वेळ ही SERVER मध्ये असलेली वेळ ग्राहय धरण्यात येईल.

५.२ सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांचे अर्ज क्रमांकाची आरक्षण निहाय प्रारुप यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर **दि.१३/०३/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता** प्रसिध्द करण्यात येईल. त्याबाबत अर्जदारांच्या तक्रारी असतील तर अशा अर्जदारांनी संकेत स्थळावर माहिती प्रसिध्द झाल्यापासून २४ तासात या कार्यालयाकडे निवेदन सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. तथापि अर्जदाराने अर्जामध्ये लिहिलेल्या माहिती मध्ये बदल केला जाणार नाही. सोडतीनंतर कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही. अशा प्रकारे आलेल्या हरकतींची छाननी करुन सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांची अंतिम यादी **दि. १५/०३/२०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** वरील संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**सोडतीसाठी पात्र ठरलेल्या अर्जांची संगणकीय सोडत दिनांक २२/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता काढण्यात येईल. (स्थळ-मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी,अमरप्रीत हॉटेल जवळ,औरंगाबाद) तसेच सोडतीच्या दिनांकाबाबत अर्जदारांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

५.३ संगणकीय सोडत काढताना अर्जदाराच्या अर्जाचा क्रमांक हाच लॉटरी जनरेशन क्रमांक म्हणून गृहित धरण्यात येईल. सोडतीच्या निकालात त्यांनी त्यांच्या अर्जाचा क्रमांक तपासावा. सोडतीत यशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांचे अर्जांचे क्रमांक म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेत स्थळावर तसेच म्हाडाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येतील. सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना sms, Email, whatsapp द्वारे कळविण्यात येईल. लेखी पत्र व्यवहार केला जाणार नाही.

५.४ प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या अर्जातून स्वतंत्रपणे संकेत क्रमांक निहाय व आरक्षण प्रवर्ग क्रमांक निहाय जाहिर सोडत संगणकाद्वारे काढण्यात येईल. संकेत क्रमांक निहाय व प्रवर्ग निहाय अर्जांची संख्या जास्त असल्यास प्रत्येक योजना संकेत क्रमांक प्रवर्गाकरीता उपलब्ध सदनिकांच्या संख्येएवढी यशस्वी यादी व संख्येच्या प्रमाणात प्रतिक्षा यादीसाठी सोडत काढण्यात येईल. मात्र प्रत्येक प्रवर्गाकरीता उपलब्ध सदनिकांच्या संख्येपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाले तरी उपलब्ध सदनिकांच्या वितरणासाठी प्राधान्य क्रमांक ठरविण्यासाठी सोडत काढण्यात येईल. सोडतीत यशस्वी ठरणाऱ्या अर्जदारांची यादी ही "यशस्वी लाभार्थींची यादी" म्हणून समजण्यात येईल.

५.५ सोडतीमध्ये अयशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) अर्ज शुल्क वगळून, Electronic Clearing System (E.C.S)/NEFT द्वारे अर्जदाराच्या बँक खात्यात पाठविण्यात येणार असल्यामुळे अर्जदाराने त्यांच्या अर्जात त्याच्या बँकेचे नाव, शाखेचा पत्ता, बँक खाते क्रमांक व एम.आय.सी.आर क्रमांक (९ अंकी) अथवा आय.एफ.एस.सी क्रमांक अचूकपणे नमूद करावा. ज्या अर्जदाराची Debit/Credit Card द्वारे अनामत रक्कम जमा केली आहे. अशा अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम सुध्दा त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या बँक खात्यावरच परत करण्यात येईल.

५.६ **अर्जदाराने ज्या प्रवर्गातील राखीव गाळयांकरीता अर्ज केला आहे त्या प्रवर्गात मोडत असल्याबाबत संबंधित सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेल्या दाखल्याची प्रमाणित प्रत सादर करावी.**

५.७ अर्जदाराने मागासवर्गीय प्रवर्गामध्ये अर्ज केला असल्यास त्या प्रवर्गात असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून दिलेले जातीचे प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक राहिल. शासन निर्णयानुसार अनुसूचित (SC), जाती अनुसूचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जमाती (DT) या प्रवर्गातील यशस्वी अर्जदारांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र (Cast Validity Certificate) प्रथम सूचनापत्र दिल्यापासून ३ महिन्यात सादर करणे अनिर्वाय राहिल. सदर जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय गाळे / भुखंड /सदनिकांचा ताबा देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अशा प्रवर्गातील अर्जदारानी पात्र ठरल्यानंतर व तसे कळविण्यानंतर विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र (Cast Validity Certificate) सादर करावे.

५.८ अर्जदाराला सोडतीमध्ये अर्ज केल्यापासून सोडतीपर्यंतची माहिती त्यांनी दिलेल्या मोबाईल वर एस.एम.एस., व्हॉट्स ॲप, ई-मेल द्वारे पाठविण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने अचूक मोबाईल क्रमांक व ई-मे आय.डी दयावा. **अर्जदाराने अर्ज भरताना दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल बदलु नये अथवा बंद करु नये.**

५.९ **सदरच्या कालावधीत मोबाईलमध्ये Do not disturb (DND) ही सेवा कार्यरत नसल्याची अर्जदारांने दक्षता घ्यावी.**

६. <u>सदनिकांची विक्री किंमत व ती भरणा करावयाच्या सर्वसाधारण अटी व शर्ती</u>:-

अ. योजनेतील प्रत्येक सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत तात्पुरती असून औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना सदनिकेच्या विक्रीची किंमत व दर अंतिम करण्याचा वा त्यामध्ये वाढ करण्याचा तसेच सदनिकांच्या संख्येत वाढ वा घट करण्याचा अंतिम अधिकार राहिल.

ब. सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांनी अर्ज मागे घेतल्यास (देकारपत्र निर्गमित होण्यापुर्वी) अर्जासोबत भरलेल्या अनामत रक्कमेतून १०००/-रुपये इतकी रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल. तसेच सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांनी देकारपत्र निर्गमित केल्यानंतर अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेल्या अनामत रक्कमेतून सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% इतकी रक्कम किंवा रु.१०००/- या दोन्हीपैकी जी रक्कम जास्त असेल ती प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करण्यात येईल व उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल.

क. अर्जदार किंवा त्याचे पती/पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात/विविध संकेताकांत अर्ज केल्यास व त्याचे विविध प्रवर्गात/विविध संकेतांमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकाच प्रवर्गात/ एकाच संकेतांकात एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या प्रवर्गामध्ये / सकेतांकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असून तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल.

ङ या माहिती पुस्तकेत दिलेला तपशील फक्त निदर्शक आहे. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थींना वेळोवेळी म्हाडाद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम १९८१ / महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ च्या तरतुदी वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

इ. **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मिळकत व्यवस्थापन विनियम १९८१ मधील तरतूदीनुसार मंडळाच्या सदनिकेची ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत विक्री करता येणार नाही. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सदर अट १० वर्षाची असेल. सदनिकेची अनधिकृत विक्री, हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास संबंधित सदनिकाधारकाविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.**

फ. शासनाच्या सुधारीत धोरणानुसार सदनिकेच्या किंमतीवर लागणारा सेवा कर अथवा भविष्यात लागू होणारे इतर कर गाळेधारकांना भरावे लागतील.

ज. **शासन निर्णय क्रमांक याचिका-२०१९/ प्र.क्र.६६/गृनिप अन्वये राज्यातील एखादी व्यक्ती किंवा त्याचे / तिचे कुटुंबातील कोणतीही व्यक्ती, राज्यातील कोणत्याही भागात महाराष्ट्र शासनाच्या किंवा शासन अधिनस्त कोणत्याही प्राधिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कोणत्याही शासकिय गृहनिर्माण योजनेत त्याला मालकी तत्वावर वाटप झालेले / वितरित झालेले घर/ सदनिका धारण करत असेल तर यापुढे, अशा व्यक्तीश किंवा त्याच्या/ तिच्या कुटुंबियांना राज्यामध्ये कोठेही राज्य शासनाच्या / शासन अधिनस्त प्राधिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या, त्या किंवा अन्य कोणत्याही गृहनिर्माण योजनेत शासकिय योजनेतील दुसरे घर / सदनिका, वाटप / वितरित करता येणार नाही.**

## ६. विशेष अटी व शर्ती :-

**अ)** **<u>प्रधान  मंत्री आवास योजना</u>**

१) अर्जदार व अर्जदाराच्या कुटुंबाच्या नावे भारतात कुठेही पक्के घर नसावे.

२) अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

३) अर्जदारास अर्ज करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नोंदणी असणे अथवा नोंदणी करणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घटक क्र. ३ मध्ये नोंदणी केलेली असल्यास अर्ज क्रमांक अर्जात नमुद करणे आवश्यक आहे.

४) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी अर्जदार कुटुंबामध्ये पती, पत्नी व अविवाहीत मुले यांचा समावेश असेल तसेच सदनिकांसाठी कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील.

५) पात्र अशा लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क (Stamp Duty), नोंदणी शुल्क, भुईभाडे व अकृषिक आकार अदा करावा लागेल.

६) सदर योजना अग्रीम अंशदान तत्वावर राबविण्यात येत असल्याने पात्र लाभार्थ्यांना सदनिकांची विक्री किंमत बांधकामाच्या प्रगतीपथानुसार मंडळाने निर्धारित केलेल्या हप्त्यानुसार भरावी लागणार आहे.

७) शासन निर्णय गृहनिर्माण विभाग, दि. १८.०८.२०१६ अन्वये, प्राप्त लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सदनिकांची पुर्नविक्री सदनिकांचा ताबा मिळाल्यापासून १० वर्षे करता येणार नाही.

**८) अर्जदाराचे व त्याचे कुटुंब (पती व पत्नी) यांचे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे एकत्रित मासिक उत्पन्न रु. २५,०००/- पेक्षा जास्त नसावे.**

**ब. म्हाडा गृहनिर्माण योजना**

**ब.१** सदनिकांचे ताबापत्र स्थानिक स्वराज्य संस्थेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पाठविता येईल. तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास उशीर झाल्यास त्याला म्हाडा जबाबदार राहणार नाही.

**ब.२** यशस्वी अर्जदारास ताप्तुरते देकारपत्र ई-मेलने पाठविण्यात येईल.सदनिकेची किंमत अदा करण्यासाठी / भरण्यासाठी सदर तात्पुरत्या देकारपत्रात योजना निहाय रक्कम भरण्याचा तपशील कळविण्यात येईल.

**ब-२.१** देकारपत्रात नमुद कालावधीत रक्कम भरणे बंधनकारक राहील. जर सदनिकेची किंमत विहीत मुदतीत अदा करणे शक्य नसेल तर किंमत भरण्यासाठी नमुद केलेल्या विहीत कालावधीच्या आत मिळकत व्यवस्थापक / औरंगाबाद मंडळ यांच्याकडे मुदतवाढीसाठी अर्ज करता येतो. मिळकत व्यवस्थापक /औ.मं. मंडळ यांना योग्य वाटल्यास भरणा करावयाच्या रक्कमेवर द.सा.द.शे. १३.५% दराने व्याज आकारणी करून नियमानूसार योजना निहाय मुदतवाढ देण्यात येते. ह्यानंतरही सदनिकेची किंमत अदा करण्यात कसुर केल्यास किंबहुना न भरल्यास तात्पुरते देकारपत्र तात्काळ रद्द करण्यात येते.सदनिकेच्या किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण केली जाते. उर्वरित रक्कम कोणतेही व्याज न देता अर्जदारास परत करण्यात येते.

**ब.२.२** ज्या अर्जदारांना १००% रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एक रकमी) भरावयाची आहे, असे अर्जदार एक रकमी म्हणजेच १००% रक्कम भरु शकतात.

**ब.३** लाभार्थी अर्जदाराने मागणी केल्यास कोणत्याही वित्तिय संस्थेकडून कर्ज प्राप्त होण्यासाठी मंडळाचे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येईल. त्याकरीता अर्जदाराने "ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेसाठी पोस्ट लॉटरी सॉफ्टवेअर द्वारे अर्ज करणे आवश्यक आहे.

**ब.४** सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांनी अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेली अनामत रक्कम विनाव्याज १०००/- रुपये इतकी प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करुन परत करण्यात येईल.

**ब.५** अर्जदार किंवा त्यांचे पती / पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात / विविध संकेतांकात अर्ज केल्यास व त्यांचे विविध प्रवर्गात / विविध संकेतांमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकाच प्रवर्गात / एकाच संकेतांकात एकच सदनिका वितरीत

करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या प्रवर्गामध्ये/संकेतांकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असेल तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल. अशा प्रकारे माघार घेतेलेल्या सर्व अर्जांसाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विना व्याज रु.१०००/- इतकी रक्कम  प्रशासकिय खर्च म्हणून वजावट करुन परत करण्यात येईल.

**ब.६** तात्पुरते देकार पत्र (Provisional Offer Letter) दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने सदनिका नाकारली किंवा कोणत्याही करणास्तव वितरण रद्द करण्यात आल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% किंवा रु.१०००/- या दोन्ही पैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम समपहरण करुन उर्वरीत रक्कम कोणतेही व्याज न देता परत करण्यात येईल. अर्जदाराने सदनिकेच्या विक्री किंमतीपैकी निरंक रक्कमेचा भरणा केल्यास तथा उपरोक्त समपहरण करावयाची रक्कम अनामत रक्कमेपेक्षा कमी भरल्यास, अर्जदारास अनामत रक्कमेचा परतावा करण्यात येणार नाही.

**ब.७** यशस्वी लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, भुईभाडे व अकृषिक आकार अदा करावा लागेल.

**ब.८** सार्वजनिक सुविधांकरीता येणारा देखभाल व दुरुस्ती खर्च सदनिकाधारकांस स्वतंत्रपणे  नियोजित सोसायटीकडे भरावा लागेल.

**ब.९** लाभार्थ्याने मंडळास मागणी केल्यानुसार सदनिकेची संपूर्ण किंमत सदनिका ताब्यात घेण्यापूर्वी अदा करावी लागेल.

**ब.१०** सामाईक विद्युत जोड, पाणी जोडसाठी नियोजित सोसायटीमार्फत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे अर्ज करुन नियमानुसार जोड घेणे आवश्यक आहे.

## ७. अर्जामध्ये लिहावयाचे आरक्षित गटाचे नाव व त्याचे विवरण :

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण |
|---|---|
| **अनुसूचित जाती व नवबौध्द (SC):**<br>**(एकुण आरक्षण ११%)** | अनुसूचित जाती (SC) याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ खाली, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ज्यांना अनुसूचित जाती समजण्यात आले आहे अशा जाती, वेश किंवा जमाती यामधील त्यांचा भाग किंवा गट असा आहे. |
| **अनुसूचित जमाती (ST):**<br>**(एकुण आरक्षण ६%)** | अनुसूचित जमाती (ST) याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ खाली महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही भागात वास्तव्य करुन राहणाऱ्या ज्यांना अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येते अशा जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| **भटक्या जमाती (NT):**<br>**(एकुण आरक्षण १.५%)** | "भटक्या जमाती" (NT) याचा अर्थ शासनाने तशी मान्यता दिलेल्या महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| **विमुक्त जमाती (DT):**<br>**(एकुण आरक्षण १.५%)** | "विमुक्त जमाती" (DT) याचा अर्थ शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| **पत्रकार (JR):**<br>**(एकुण आरक्षण २.५%)** | म्हाडा जनसंपर्क कार्यालयाद्वारे पत्रकार म्हणून दिलेले प्रमाणपत्र. |
| **स्वातंत्र्य सैनिक (FF):**<br>**(एकुण आरक्षण २.५%)** | "स्वातंत्र्य सैनिक" याचा अर्थ, महाराष्ट्र सरकार किंवा भारत सरकारकडून मान्य झालेले स्वातंत्र्य सैनिकांसाठी मंजूर झालेली निवृत्त वेतन मिळणारी व्यक्ती किंवा भारताच्या स्वातंत्र्य मुक्तीच्या राष्ट्रीय चळवळीमध्ये सहभाग असल्याबद्दलचे ताम्रपत्र / सन्मानपत्र बहाल करण्यात आलेली व्यक्ती, किंवा त्यांचे वारसदार (Next-of-kin) स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून असणारी व्यक्ती जसे विधवा वा विधुर साथीदार, वडील / आई, मुलगा, नातु, मुलाची पत्नी, नातवाची पत्नी, यापूर्वी मृत्यु पावलेल्या मुलाची / किंवा नातवाची विधवा याबाबत मा. जिल्हाधिकाऱ्यांचे संबंधित प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल. स्वातंत्र्यसैनिक वा त्यांचे पश्चात वरील प्रमाणे त्यांचे |

<table>
<tr><td></td><td colspan="2">कुटुंबातील घटक व्यक्ती मिळून एकाहुन अधिक सदनिका / भुखंड चा लाभ मिळणार नाही.</td></tr>
<tr><td rowspan="7">अंध किंवा शारिरीक दृष्ट्या अपंग व्यक्ती (PH):<br>(एकुण आरक्षण ३%)</td><td>अंधत्व पूर्ण<br>(Blindness)</td><td rowspan="7">UDID (Unique Disability Identity Card)<br>(शासन निर्णयानुसार ४०% किंवा त्यापेक्षा अधिक अपंगत्व असणे आवश्यक आहे.)</td></tr>
<tr><td>कमी दृष्टी<br>(Low Vision)</td></tr>
<tr><td>कुष्ठरोग मुक्त<br>(Leprosy Cured)</td></tr>
<tr><td>कर्णबधीर<br>(Hearing Impairment)</td></tr>
<tr><td>अवयवातील कमतरता<br>(Locomotor Disability)</td></tr>
<tr><td>मतिमंदत्व<br>(Mental Retardation)</td></tr>
<tr><td>मनोविकृती<br>(Mental Illness)</td></tr>
<tr><td>संरक्षण आणि सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्यांचे कौटुंबिय अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF):<br>(एकुण आरक्षण २%)</td><td colspan="2">अ. या प्रवर्गातील संरक्षण दलातील जे कर्मचारी किंवा सीमा भागातील रस्ते बांधणी व विकास मंडळाचे जे कर्मचारी युध्दात जखमी होऊन विकलांग झाले आहेत असे कर्मचारी आणि जे युध्दात मारले गेले असतील किंवा जे बेपत्ता असल्याचे घोषित केले असतील अशा व्यक्तिचे कुटुंबिय अर्ज करु शकतात. यासंबंधीचे आवश्यक ते प्रमाणपत्र संबंधित संरक्षण प्राधिकाऱ्यांकडून मिळवावे लागेल. "कुटुंब" संज्ञेत विवाहसाथी, मुले, आणि अविवाहीत मुली यांचा अंतर्भाव होतो.<br>ब. या प्रवर्गातील पुरेसे अर्ज आले नाहीत तर या प्रवर्गातील आवश्यक ती गरज भागून ज्या सदनिका शिल्लक राहतील त्या सदनिका माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ति यांचेसाठी वर्ग करण्यात येतील.</td></tr>
<tr><td>माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबुन असणाऱ्या व्यक्ति<br>(Ex-serviceman):<br>(एकुण आरक्षण ५%)</td><td colspan="2">अ. "माजी सैनिक" याचा अर्थ संघ राज्याच्या सशस्त्र दलातील माजी सदस्य असा आहे. (ज्या व्यक्तिच्या संबंधात सेवा न्यायालयाची कार्यवाही झाल्यानंतर किंवा वाईट चारित्र्यामुळे किंवा दलातुन तो निघुन गेल्याच्या परिणामी ज्याला काढून टाकण्यात आले असेल किंवा ज्याला अटक केल्याच्या</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | कारणास्तव दलातुन काढून टाकण्यात आले आहे अशा माजी सैनिकांचा समावेश या प्रवर्गात होणार नाही.)<br><br>ब. माजी सैनिकावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांचा अर्थ विवाह साथीदार, मुलगे, अविवाहीत मुली, आई, वडील असा आहे.<br><br>क. संबंधित संरक्षण प्राधिकरण व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून आवश्यक ती प्रमाणपत्रे मिळवावी लागतील.<br><br>ङ माजी सैनिक वा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील घटक व्यक्ती यांना एकाहून अधिक सदनिकांचा / भुखंडाचा लाभ मिळणार नाही. या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ सर्वसाधारण राखीव अभियांत्रिकी सेनेतील कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय व त्यांचेवर अवलंबून असलेल्या व्यक्ती योग्य फेरफारासह घेऊ शकतील |
| **महाराष्ट्र राज्यातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे, लोकसभा, विधानसभा व विधानपरिषदेचे विद्यमान व माजी सदस्य**<br><br>**(MP/MLA/MLC):**<br><br>**(एकुण आरक्षण २%)** | अर्जदार कोणत्या मतदार संघातून निवडून आला आणि कोणत्या वर्षी निवडून आला आहे / होता ते प्रमाणित करणारे आवश्यक प्रमाणपत्र संबंधित संसद / विधानसभा / विधानपरिषद सचिवालयाच्या सचिवाने दिलेले असावे. तसेच अर्जदारास खालील अटी लागू रहातील.<br><br>१. महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी एक सदनिका किंवा भुखंड प्राप्त करु शकेल.<br>२. ज्या ठिकाणी, अर्जदार, प्राधिकरणाने बांधलेली सदनिका किंवा भुखंड प्राप्त करु इच्छित असेल त्या ठिकाणी एखादी सदनिका किंवा भुखंड मालकी तत्त्वावर किंवा भाडेखरेदी तत्त्वावर अथवा भाडे तत्त्वावर त्याच्या / तिच्या कब्जामध्ये नसावा.<br>३. शासनाकडून किंवा प्राधिकरणाकडून, मिळवलेली एखादी सदनिका अथवा निवासी भुखंड भाडे तत्त्वावर अथवा लिव्ह ॲण्ड लायसन्सच्या तत्त्वावर अगोदरच त्यांच्या / तिच्या कब्जात असेल तर त्याने / तिने अशी सदनिका / निवासी भुखंड शासनाकडे किंवा प्रकरण परत्त्वे प्राधिकरणाकडे परत केली पाहिजे / केले पाहिजेत.<br><br>गाळ्यासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने वरील सर्व शर्ती पूर्ण केल्या याची खात्री पटवून देण्याकरीता उपनिर्दिष्ट सर्व शर्ती पूर्ण केल्याच्या |

| | |
|---|---|
| | पुष्ठयर्थ त्यांनी प्रतिज्ञालेख केला पाहिजे. |
| **म्हाडा कर्मचारी (ME):**<br><br>**(एकुण आरक्षण २%)** | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचारी ज्यांची म्हाडामध्ये सलग कायम आस्थापनेवर ०५ वर्षे सेवा झाली आहे असे अर्जदार या संवर्गात सदनिका मिळण्यासाठी पात्र ठरतील. प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी व त्याचप्रमाणे शिकाऊ उमेदवार, तात्पुरती भरती केलेला नोकरवर्ग आणि ज्यांना महाराष्ट्र राज्यामध्ये कोठेही यापूर्वी या आरक्षणाखाली जागा मिळालेली आहे व त्याचप्रमाणे कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत निर्माण झालेल्या संस्थांचे जे सदस्य आहेत तसेच ज्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने मालकी तत्त्वावर देण्यात आली आहेत त्यांना या प्रवर्गामध्ये गाळ्यासाठी अर्ज करता येणार नाही. वरील प्रमाणे निकषांची पूर्तता करणारे म्हाडा कर्मचारी असल्याचे सचिव / प्रा. यांचे प्रमाणपत्र पात्रतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. |
| **राज्य शासनाचे व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील संविधानिक मंडळ, महामंडळे इ. चे कर्मचारी तसेच अगोदर निवृत्त झालेले कर्मचारी**<br><br>**(SG):**<br><br>**(एकुण आरक्षण ५% )** | राज्य शासनाचे व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील संविधानिक मंडळे, महामंडळाचे कर्मचारी त्यांची कायम आस्थापनेवर कमीत कमी ०५ वर्षे सेवा झाली आहे असे अर्जदार या संवर्गात सदनिका मिळण्यासाठी पात्र ठरतील. या प्रवर्गात महानगरपालिका, नगरपरिषद व जिल्हापरिषद तसेच अनुदानित / विनाअनुदानित शैक्षणिक / अशैक्षणिक संस्था यांचे कर्मचारी हे स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी असल्यामुळे या आरक्षित गटाकरीता अर्ज करण्यास पात्र नाहीत. तसेच म्हाडा कर्मचारी या प्रवर्गासाठी अर्ज करण्यासाठी पात्र नसतील. असे कर्मचारी / निवृत्त कर्मचारी यांना त्यांच्या खात्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| **शासकीय निवासस्थानात राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र शासनाचे कर्मचारी (CG):**<br><br>**(एकुण आरक्षण २%** | अ. या प्रवर्गातील अर्जदाराला, त्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून तो ३ वर्षाच्या कालावधीत सेवानिवृत्त होणार असल्याचे आणि तो कर्मचारी महाराष्ट्र राज्यातील सेवा निवासस्थानात राहात असल्याचे प्रमाणपत्र मिळवावे लागेल व सोडतीत यशस्वी झाल्यानंतर प्रमाणपत्र सादर करावे लागेल. जे अगोदर निवृत्त झाले असतील त्यांना देखील या प्रवर्गाचा लाभ घेता येईल. जाहिरात प्रसिध्द झाल्याचा दिनांक हा सेवानिवृत्तीच्या पूर्वीचा ३ वर्षाचा कालावधी ग्राह्य धरला जाईल.<br><br>**ब. नियत वयोमान झाल्यानंतर ३ वर्षामध्ये निवृत्त होणाऱ्या व्यक्तीकरिताच केवळ ही सवलत आहे. स्वेच्छेने निवृत्त** |

| | |
|---|---|
| | **झालेल्या केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी ह्या प्रवर्गाचा लाभ घेता येणार नाही.**<br>क. ३ वर्षामध्ये निवृत्त होणारे जे कर्मचारी महाराष्ट्र राज्यातील त्यांना वितरीत केलेल्या शासकीय निवासस्थानात राहत नाहीत अशा कर्मचाऱ्यांना या आरक्षित गटाचा लाभ घेता येणार नाही.<br>ड. जे अर्जदार ३ वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत व ते महाराष्ट्रामध्ये सेवेत आहेत अशा केंद्रीय कर्मचाऱ्यांनाच ह्याचा लाभ घेता येईल. त्याकरीता अधिवास प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. |
| **कलाकार (AR):**<br>**(एकुण आरक्षण २%)** | चित्रपट / दुरदर्शन / नाटक / तमाशा / आकाशवाणी / चित्रकार / मुर्तिकार / क्राफ्टमन / संगीतकार / नृत्य इ. क्षेत्रातील कलाकार व्यक्ती संपूर्णपणे कलादर्शनातून व कला व्यवसायातून होणाऱ्या प्राप्तीवर निर्भर असून त्यावरच प्रामुख्याने त्यांची उपजिवीका अवलंबून आहे व जी व्यक्ती कलेची साधना गेली १५ वर्षे करीत आहे. अशाच व्यक्ती कलाकार या प्रवर्गासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. उपजिविकेकरिता इतर व्यवसायावर अवलंबून असून फावल्या वेळी कलेची उपासना, छंद व व्यासंग म्हणून कलेची जोपासना करणारी व्यक्ती या प्रवर्गासाठी पात्र नाही. **कलाकार या प्रवर्गासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय किंवा महाराष्ट्र राज्य कला संचालनालय कडून आवश्यक प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील**. केवळ एखाद्या शिक्षण संस्थेत किंवा महाविद्यालयात कलेच्या क्षेत्रात मिळविलेली पदवी अर्जदारास कलाकार म्हणून मान्यता देण्यास पुरेशी नाही असे स्पष्टपणे नमुद करण्यात येत आहे. |
| **सर्वसाधारण जनता (GP):**<br>**(एकुण आरक्षण ५०%)** | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८१ मधील नियम १३ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ मधील नियम १६ मध्ये अंतर्भूत असलेले आरक्षित गट / प्रवर्ग वगळून प्रस्तुत योजनेतील ५०% सदनिका या सर्वसाधारण जनतेसाठी उपलब्ध असतील. |

**मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी, कोणतेही कारण न देता, या गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत येणारे अर्ज स्विकारणे वा नाकारणे किंवा सर्व योजना किंवा एखादी विशिष्ट योजना रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.**

**माहितीपुस्तिकेतील अनावधानाने झालेल्या छपाईच्या चुकीचा फायदा अर्जदारास घेंता येणार नाही.**

**मुख्य अधिकारी**

**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.**

## **विशेष सुचना:-**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या अंतर्गत (भू-विनियोग) आणि (मालमत्ता व्यवस्थापन, गाळयांची विक्री व हस्तांतरण आणि अदलाबदल) व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणांच्या अधिन राहून महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना विभाग दि. ०८/११/२०१३ रोजीची अधिसूचना क्र. टीपीबी ४३१२/प्र.क्र.४५/२०१२/(१)/नवि-११ व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणांनुसार सर्वसमावेशक गृहनिर्माण योजने अंतर्गत सदनिकांच्या विक्रीसाठी पात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित करण्यासाठी औरंगाबाद मंडळातर्फे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

### **सावधानतेचा इशारा :**

**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी /सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही.अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला औरंगाबाद मंडळ /म्हाडा जबाबदार राहणार नाही.**

# ऑनलाईन नोंदणी व अर्जासाठी Help File

## ऑनलाईन फॉर्म भरताना खालील ३ बाबी लक्षात घ्याव्यात.

अ. **नोंदणी :** नविन अर्जदार ज्याला म्हाडाच्या सोडत फेब्रुवारी-२०२३ चा ऑनलाईन फॉर्म भरावयाचा आहे. त्यास प्रथमत नोंदणी करताना अर्जदाराने त्याची प्राथमिक माहिती उदा.अर्जदाराचे नाव, पॅनकार्ड क्र. आधार कार्ड क्र. भ्रमणध्वनी क्र. व्हॉट्स ॲप क्र. बँक अकाउंट क्र. (रिंफडसाठी) इ. आवश्यक आहे.

ब. **ऑनलाईन अर्ज भरणे** : नोंदणीकृत अर्जदार त्याची माहिती उदा. उत्पन्न प्रवर्ग, आरक्षण प्रवर्ग इ.बाबी भरुन ऑनलाईन फॉर्म भरु शकतो.अर्जदार ऑनलाईन अर्जामध्ये योजनेची विस्तृत माहिती पाहू शकतो व त्यास पाहिजे ती योजना निवडू शकतो, जी सोडतीमध्ये उपलब्ध आहे. अर्जदाराला प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र फॉर्म भरावा लागेल.

क. **अनामत रक्कम भरणे** :-अर्जदारास RTGS/NEFT, Net Banking, Credit card, Debit Card द्वारे भरता येईल.

१. माहिती पुस्तिकेत असल्याप्रमाणे अर्जदाराने आपले उत्पन्न बरोबर भरले आहे. याची अर्जदाराने खात्री करावी. त्याच्या उत्पन्नानुसार अर्जदाराचे उत्पन्न प्रवर्ग निश्चित केले जाते.

२. आपल्याकडे उपलब्ध असलेलाच भ्रमणदुरध्वनी क्र. दयावा कारण यापुढील अर्जदारास आवश्यक ते संपर्क इ. SMS द्वारेच देण्यात येतील.

३. अर्जदाराने खात्री करावी की त्याने त्याचा ई-मेल आयडी बरोबर दिला आहे. कारण यापुढील अर्जदाराबरोबरचे संपर्क ई-मेल द्वारेही होईल.

४. अर्जदारास त्याचा आधार कार्ड क्र. देणे आवश्यक आहे.

५. ऑनलाईन अर्जामध्ये ज्या बाबी " *" अशा पद्धतीने दर्शविलेल्या आहेत. त्या भरणे अनिवार्य आहे.

# अर्जदारांने सादर करावयाचे कागदपत्रे/दाखले/प्रमाणपत्रे यांचे नमुने

(Central Government Employees occupying staff quarters and due for retirement within three years or those who have already retired.)

**CERTIFICATE FOR CENTRAL GOVERNMENT EMPLOYEE**

It is hereby certified that Mr. /Mrs. …………… is Central Government employee occupying staff quarter and due for retirement within three years or he /she is working / already retired. He / She working in ……………………. department on……………………. post. He/ She will retire / has retired on Date…… He / She is currently residing at ……………… which is staff quarter allotted to him / her from Date ………… and is currently in his / her possession.

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery reserved for Central Government employee occupying staff quarters and due for retirement within three years or those who have already retired.

Date :

Place:

Signature of Competent Officer:

Signature

[illegible]fficer:

Seal

[illegible]

Department/ Corporation:

Address of Department/Corporation:

( Certificate format of Artist issued by Directorate of Cultural Affairs, Maharashtra Government On Letter Head )

**CERTIFICATE FOR ARTIST**

Its is certify that, Mr/Mrs……………………….. have experience of ……………. Years as a …………………….. This certificate is issued based on documentary evidence produced by applicant. As per documents, he/she comes under an Artist category.

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date :

Place :

Signature

Sign of Director:

Directorate of Cultural Affairs,

Maharashtra Government

Seal

(Certificate format of Freedom Fighters Next-to-kin or dependent persons issued by Collector office On Letter Head)

**CERTIFICATE FOR LEGAL HEIRS OF FREEDOM FIGHTER**

It is hereby certified that, Mr./Mrs……………………………Age…….. resident of ………………………… is a (Relation of applicant with freedom fighter to be mentioned ) of Mr./Mrs/Late…………………………………… Freedom Fighter and has participated in the National Movement for emancipation of India. This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date:

Place :

Sign of Authorized Officer: Signature

Designation of Authorized Officer:

Seal

Certificate format of Families of Defence Personnel issued by District Welfare Board On Letter Head )

**CERTIFICATE FOR DEFENCE FAMILIES**

It is certified that (Name)........................................ Age ........... Resident at ……………………. is .............. (Relation of applicant with Defence personal and personnel of Border Security Force, who have been killed or disabled or declared missing in 1962 Sino-Indian Conflict, or in 1965 or 1971 Indo-Pak Conflict, in any combat thereafter) of ................................................. Service No..................... Rank................................ had served in Defence/BSF force for .............. years..............Months............ Days . From................. (Date) to ........................ (Date). He has been discharged from service on occasion of death / disabled / declared missing in war. This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date :

Place :

Authorized Officer: SIGNATURE

SEAL

Designation of Authorized Officer:

District Welfare Board

Certificate format of Ex-Servicemen's dependents issued by District Welfare Board On Letter Head)

## CERTIFICATE FOR DEPENDENT OF EX-SERVICEMEN

It is certified that (Name of Applicant - ……………………………….) Age……… Resident at…………………….. is (relation with ex-serviceman) & dependent of, Name ………………… Service No ……………….. Rank ……………….. of Regt /Corps /Unit/ Service ……………… who has put in ……………….. years of military service in Army/Navy/Air Force from the date of enrollment/commissioning on …………………. and retired from service on …………………….

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date :

Place :

SEAL

Authorized Officer:

SEAL

Designation of Authorized Officer:

District Welfare Board

(Certificate format of Ex-Servicemen issued by District Welfare Board On Letter Head)

**CERTIFICATE FOR EX-SERVICEMEN**

Its certify that Service No ……………. Rank ………………. Name …………………of Regt /Corps /Unit/ Service …………….has been a member of Armed Forces of India. He has put in ………………. years of military service in Army/Navy/Air Force from the date of enrollment/commissioning on ………………… & retired from service on ……………………..

His/her name has been registered in this office vide Identity Card No………………… This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date :

Place :

SEAL

Authorized Officer:

Designation of Authorized Officer:

District Welfare Board

SEAL

(Certificate format of Freedom fighter issued by Collector office On Letter Head)

**CERTIFICATE FOR FREEDOM FIGHTER**

It is hereby certified that, Mr./Mrs………………………………….. Age………………….. Resident of ………………………… is a Freedom Fighter and has participated in the National Movement for emancipation of India. This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date:

Place :

SIGNATURE

Authorized Officer:

SEAL

ion of Authorized Officer:

**(Certificate format of Journalist issued by Chief Public RelationsOfficer,MaharashtraHousing&AreaDevelopmentAuthority(MHADA) )**

## CERTIFICATE FOR JOURNALIST

This is to certify that Mr./Mrs. ----------------------------- is working withthe ______________________onthepostof_______________________.

Thiscertificateisbeingissuedonthe requestby Mr./ Mrs.--------- ----------- ,to prove his/her eligibility in the journalist category in theMHADAhousing Lottery.

This certificate shall not be used in any other place and for anyother purpose other than the above mentioned purpose. If the documentssubmitted for obtaining this certificate are found to be false, fake orincorrect, you will be held responsible for the same. Also it should benoted that in such case MHADA will initiate legal action and cancel theallotment of the tenement. The Applicant will solely be responsible fortheaction.

ThiscertificateisbeingissuedtoMr./Mrs. -------------------------------------on the submission of his appeal and submitted

documents.Date:

Place:

Sign Of Authorized Officer: SIGNATURE

DesignationofAuthorizedOfficer:

SEAL

(Certificate to be submitted by Member of Parliament / Member of Maharashtra Legislature On Letter Head )

**CERTIFICATE FOR MP/MLA/MLC**

This is certified that Mr./ Mrs. ………………………………….. is sitting /ex – member of Parliament / Assembly / Council representing constituencies in Maharashtra for the Period from ……….to ………. in the ………………….. Constituency.

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery reserved for sitting and ex – Member of Parliament or assembly or council representing constituencies in Maharashtra.

Date:

Place:

SIGNATURE

SEAL

Secretariat of Parliament / Maharashtra Legislature

(Certificate to be submitted by employee / employ of State Government / Corporation on Letter Head)

**CERTIFICATE FOR STATE GOVERNMENT EMPLOYEE**

This is hereby certified that, Mr./Mrs. ………………… is State Government employee / employee of the statutory board / Corporation on …………………… post. His / Her appointment Date is ……….. and working continuously for more than 5 years means …………. Years ………. month.

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery reserved for State Government / Government Corporation employee.

Date :

Place:

Signature of Competent Officer:

Name of Competent Officer:

Designation:

Department/ Corporation:

Address of Department/Corporation:




Block View


Block View




म्हाडा
MHADA